# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १५ मार्च २०२६


## विजतार तुटून गव्हाच्या शेताला आग



**शिऊर बंगला :** येथील गट नंबर ६४४ मध्ये उभा असलेला गहू दिनांक ७.३.२०२६ रोजी विजतार तुटून लागलेल्या आगीत जळून भस्म झाला. तसेच गंजी घातलेली दीड एकर क्षेत्रातील तूर, शेततळ्याची ताडपत्री, स्प्रिंकलर्स संच, पाईप, जनावरांचा चारा व कुट्टी इत्यादी बरेच साहित्य जळून खाक झाल्याने शेतकरी मच्छिंद्र जाधव यांचे सुमारे चार लाख रुपयांपेक्षा अधिक नुकसान झाले आहे . असा प्राथमिक अंदाज आहे. सुदैवाने झाडाला बांधलेले बैल व कामकरी महिला थोडक्यात बचावले. सदरील घटनेची माहिती मिळताच सहाय्यक अभियंता निलेश ओहोळ, लाईनमन अमोल कुंटे आणि मनोज गवळी यांनी घटनास्थळाची प्रत्यक्ष पाहणी करून पुढील कार्यवाही सुरू केली आहे.

## जिंतूर आज दिनांक २२ मार्च २६ रोजी मोफत मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबिरांचे आयोजन

**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** जिंतूर येथे स्वर्गीय आयोध्या बाई तोष्णीवाल यांच्या अठराव्या पुण्यतिथीनिमित्त मोफत मोतीबिंदूचे तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन दिनांक २२ मार्च २०२६ रोजी १० ते ३ असे आयोजित करण्यात आले आहे. याबाबत मिळालेली माहिती अशी की स्वर्गीय अयोध्या बाई तोष्णीवाल चॅरिटेबल ट्रस्ट जिंतूर व उदयगिरी लायन्स नेत्र रुग्णालय उदगीर यांचे संयुक्त विद्यमाने मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया व तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून आज दिनांक २६ मार्च २०२६ रोजी डॉक्टर सुभाषचंद्र राठी बालक विद्या मंदिर, वरुड रोड ,जितूर येथे करण्यात आले असून यासाठी नाममात्र वीस रुपये नोंदणी शुल्क आकारण्यात आली आहे. या शिबिरात सहभागी होणाऱ्या रुग्णांची मोफत तपासणी आणि योग्य मार्गदर्शन करण्यात येणार असून मोतीबिंदू नोंदणीसाठी गजानन घुगे ,व्यवस्थापक नागरी पतसंस्था जिंतूर, राजेश बियाणी, अष्टविनायक मेडिकल स्टोअर्स सरकारी दवाखान्यात समोर मेन रोड, बोरी व सुभाष आप्पा एकशिंगे किरणा येलदरी कॅम्प , विपिन पांडे साई इलेक्ट्रॉनिक्स अँड जनरल स्टोअर्स येलदरी कॅम्प. यांच्याकडे नोंदणी करावी यासाठी मोतीबिंदू असलेल्या रुग्णांची डोळ्यांच्या सुसज्ज हॉस्पिटलमध्ये मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार असून मोतीबिंदू ऑपरेशन निवड झालेल्या रुग्णांची राहण्याची जेवणाची व प्रवासाची मोफत व्यवस्था करण्यात येणार आहे. या शिबिरासाठी मतदान कार्ड किंवा आधार कार्ड यांची झेरॉक्स प्रत सोबत ठेवावी तसेच शिबिरासाठी येताना चालू असलेली औषधी डॉक्टरांचे रिपोर्ट तसेच घरचा किंवा शेजाऱ्यांचा मोबाईल नंबर आणणे आवश्यक असून मोतीबिंदू ऑपरेशन साठी निवडलेल्या रुग्णांना त्याच दिवशी किंवा सोईप्रमाणे ऑपरेशन साठी नेण्यात येईल व ऑपरेशन नंतरचा मेडिकल औषधीचा खर्च स्वतः ज्याचा त्यांना करावा लागेल.तसेच नेत्ररोग लाभार्थ्यांनी या शिबिरात सहभागी व्हावे असे आव्हान आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## विक्रमी गाळप साध्य करण्याचा मानस - चेअरमन भावनाताई मुंगसे



**जिंतूर (बी.डी.रामपूरकर) :** टोकाइ सहकारी साखर कारखान्याचे आगामी गळीत हंगामाचे उदिष्ट विक्रमी करण्याचा मानस चेअरमन भावना ताई मुंगसे यांनी व्यक्त केला. भावनाताई मुंगसे यांच्या भक्कम नेतृत्वात श्री तुळजाभवानी शुगर प्रा. ली.सहयोगी तत्वावर चालवत असलेल्या टोकाई सहकारी साखर कारखान्याच्या सर्व सभासदांच्या ऊस बिलाची रक्कम खात्यावर जमा केली. सर्व सुजान शेतकरी,सभासद सन्माननीय संचालक मंडळ आणि कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने कारखान्याची यशस्वी वाटचाल सुरू असून पुढील गाळप हंगामात पूर्वीपेक्षा विक्रमी गाळप साध्य करण्याचे उद्दिष्ट असल्याचे मत भावनाताई मुंगसे यांनी व्यक्त केले. कारखाना हे एक आपले घर असून उत्पादक सभासद, संचालक कर्मचारी तसेच ऊस वाहतूकदार हे सर्व कारखान्याच्या कुटुंबातील सदस्य आहेत. सहकारी तत्त्वावर कोणताही व्यवसाय हा चालवत असताना एकमेकांना साथ देणे व एकमेकांना विश्वासात घेऊन पुढे वाटचाल करणे ही तत्त्वे पाळणे फार मोलाची असतात"बिना सहकार नही उद्धार" या म्हणीप्रमाणे एकमेकांवर विश्वास ठेवून एकमेकांना सहकार्य करून आपण निरंतर आपली यशस्वी वाटचाल सुरू ठेवू शकतो. पण दुर्दैवाने काही सन्माननीय संचालक बांधव ऊस उत्पादक शेतकऱ्यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत असल्याचे जाणवले याचे अतिव दु:ख झाल्याचे मत व्यक्त करत या बद्दल तीव्र नाराजी भावनाताई मुंगसे यांनी यावेळी व्यक्त केली. कोणत्याही सहकारी साखर कारखान्याचा ऊस उत्पादक शेतकरी हा कणा असतो. शेतकरी बांधवांचा विश्वास संपादन करूनच पुढील यशस्वी वाटचाल करावी लागते. ऊस उत्पादक शेतकरी मोठ्या विश्वासाने कारखान्यावर ऊस आणतो व आपलं भविष्य ठरवतो पण काही संचालक मंडळ त्यांची दिशाभूल करत असल्याने निदर्शनास आलेले आहे. तेव्हा अशा कोणत्याही अफेवर ऊस उत्पादक शेतकरी बांधवांनी विश्वास ठेवू नये.अशी भावना भावना ताई मुंगसे यांनी व्यक्त केली.

## शासनाच्या सर्व योजना प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचल्या पाहिजेत : विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर



**बीड (भगवंत पाळवदे) :** गावागावातील नागरिकांच्या समस्या त्वरित सोडविणे आणि शासनाच्या सर्व योजना थेट प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविणे हे प्रशासनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. महसूल विभागासह विविध शासकीय योजनांचा लाभ नागरिकांना त्यांच्या गावातच मिळावा यासाठी राज्य शासनाने 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर' मंडळ स्तरावर आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. या शिबिरांचा प्रभावी वापर करून गावातील सर्वसामान्यांच्या अडचणी सोडवाव्यात, असे आवाहन छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केले.बीड तालुक्यातील तळेगाव येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहेमान, अप्पर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.विभागीय आयुक्त पापळकर पुढे म्हणाले की, सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी वारंवार तहसील किंवा जिल्हाधिकारी कार्यालयात येण्याची गरज भासू नये, यासाठीच मंडळ स्तरावर शिबिरे घेण्याची संकल्पना राबविण्यात येत आहे. या शिबिरांच्या माध्यमातून महसूल विभागाशी संबंधित विविध प्रश्नांसह शासनाच्या समाजोपयोगी योजनांची माहिती व लाभ नागरिकांना दिले जाणार आहेत.शेतकऱ्यांसाठी शेतपांदण रस्ते, बांधावरील मार्ग यासंदर्भात अनेकदा वाद-विवाद निर्माण होतात. अशा समस्या सोडवण्यासाठी राज्य शासनाने शेतपांदण रस्ते उपक्रम सुरू केला असून तो 30 मेपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले.गावागावातील प्रश्न सोडवताना तलाठी, सरपंच आणि स्थानिक प्रतिष्ठित नागरिक यांच्या समन्वयातून उपाययोजना कराव्यात, असेही त्यांनी सांगितले.या शिबिरांमध्ये संजय गांधी निराधार योजना, वारसा हक्काचे फेरफार, जिवंत सातबारा, आयुष्मान भारत आरोग्य योजना यांसह विविध योजनांबाबत नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण केले जात आहे. गावातील प्रत्येकाने पक्षीय भेदभाव बाजूला ठेवून गावकऱ्यांच्या समस्या या शिबिरात मांडाव्यात आणि नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त पापळकर यांनी केले.प्रशासनातील अधिकारी अथवा कर्मचारी नागरिकांचे प्रश्न सोडवण्यात टाळाटाळ करत असतील तर नागरिकांनी थेट जिल्हाधिकारी किंवा विभागीय आयुक्त कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.या शिबिरात प्रातिनिधिक स्वरूपात जातीचे प्रमाणपत्र, आयुष्मान भारत आरोग्य कार्ड, गरोदर मातांना आरोग्य किट यांसह विविध योजनांतील लाभांचे वितरण करण्यात आले.कार्यक्रमास तहसीलदार चंद्रकांत शेळके, नायब तहसीलदार सुहास हजारे, तळेगावचे सरपंच तसेच परिसरातील इतर गावांचे सरपंच आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.संघर्षाला मिळाला न्यायपारधी समाजातील आप्पा भुजा पवार यांनी आपल्या कुटुंबाला हक्काचे घर मिळावे आणि मुलांना शिक्षणाची संधी मिळावी यासाठी अनेक वर्षे सातत्याने संघर्ष केला. मात्र, दुर्दैवाने सन 2023 मध्ये त्यांचे निधन झाले. या प्रकरणाची प्रशासनाने दखल घेत पवार कुटुंबाच्या पुनर्वसनासाठी तळेवाडी येथे एक एकर जागा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात आली.आज या संदर्भातील पुढील कार्यवाही छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या हस्ते पार पडली.या निर्णयामुळे संबंधित कुटुंबाला हक्काची जागा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून त्यांच्या पुनर्वसनाला मोठी मदत होणार आहे. आप्पा पवार यांनी आपल्या कुटुंबाच्या भविष्यासाठी केलेल्या संघर्षाला अखेर न्याय मिळाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.